# University of Mumbai

Phone – 68320000
Email – *ar.bod.ac@fort.mu.ac.in*

/731

**विद्याविषयक प्राधिकरणे
बैठका व सेवा विभाग
फोर्ट, मुंबई— ४०००३२.**

**ए.ए.एम.एस/आयसीसी/२०२४—२५/१६**

**परिपत्रक:—**

विषय:— राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अमंलबजावणीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या दि.०८—०९ ऑक्टोबर,२०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ:— १. परिपत्रक क्र. ए.ए.एम.एस/आयसीसी/२०२४—२५/९ दिनांक ८ नोव्हेंबर, २०२४.
२. परिपत्रक क्र. ए.ए.एम.एस/आयसीसी/२०२४—२५/१० दिनांक ९ डिसेंबर, २०२४.
३. शासन पत्र क्र. युएनआय/विशि—१/टे.क्र. ४०/E – 1267932, दि. निरंक

मुंबई विद्यापीठाच्या अधिनस्त असलेले सर्व संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालये/संस्था, यांचे प्राचार्य/संचालक व विभागप्रमुख यांना महाराष्ट्र शासनाचे क्रमांक युएनआय/(१३६/२२)/विशि—१/भाग—३/४८६६ दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रानुसार मुद्दा क्र. ड नुसार OJT/Internship/Field Project संदर्भात महाविद्यालयांकडुन माहिती मागविण्यात आली असून सदरची माहिती ज्या महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविला जातो त्यांनी माहिती संचालनालयास https://forms.gle/F7iCdnGbtPMH5nGK7 या google form लिंक द्वारे पाठविण्यात यावी, असे परिपत्रक क्र. ए.ए.एम.एस/आयसीसी/२०२४—२५/९ दिनांक ८ नोव्हेंबर, २०२४ व परिपत्रक क्र. ए.ए.एम.एस/आयसीसी/२०२४—२५/१०दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार कळविण्यात आले होते.

याबाबत शासन पत्र क्र. युएनआय/विशि—१/टे.क्र. ४०/E – 1267932, दि. निरंक नुसार महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण संचालनालयाने मुद्दा क्र. ई नुसार खालीलप्रमाणे कळविले आहे:—

२/—

**University of Mumbai**

Phone – 68320000
Email – *ar.bod.ac@fort.mu.ac.in*

/731

विद्याविषयक प्राधिकरणे
बैठका व सेवा विभाग
फोर्ट, मुंबई— ४०००३२.



**ई)** OJT/Internship संदर्भात यापूर्वी गुगल फॉर्म क्रमांक १ व २ द्वारे सर्व विद्यापीठांकडून आणि स्वायत्त महाविद्यालयांकडून माहिती संकलित करण्यात आली होती. तथापि मागविण्यात आलेल्या माहितीत त्रुटी असणे तसेच चुकीची माहिती अपलोड करणे किंवा माहिती निरंक म्हणून दर्शविणे या कारणास्तव सदर माहितीचे पृथकरण करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. सबब, खालील दिलेले गुगल फॉर्म क्रमांक १ व २ ची लिंक आणि त्या लिंकचा Edit option सर्व विद्यापीठांसाठी/स्वायत्त महाविद्यालयांसाठी खुला करण्यात येत असून विद्यापीठांनी/स्वायत्त महाविद्यालयांनी आपली माहिती पुन्हा Edit करून अचूकपणे भरून submit करावी.

गुगल लिंक खालीलप्रमाणे:—

| अ. क्र. | गुगल लिंक | | |
|---|---|---|---|
| | https://forms.gle/F7iCdnGbtPMH5nGK7<br>गुगल फॉर्म लिंक क्रमांक २ | राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आंतरवासिता /फिल्ड प्रोजेक्ट/ओजेटी संदर्भातील अभ्यासक्रमाची माहिती | अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी |

याबाबत आपणांस सुचित करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार सदर माहिती दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत गुगल लिंकवर तात्काळ पाठविण्यात यावी.

सदर माहिती अत्यंत तातडीची समजून विनाविलंब पाठविण्यात यावी.

सदरबाबतचे परिपत्रक मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मुंबई — ४०००३२
११ फेब्रुवारी, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११ ०१६**
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/विशि-१/टे.क्र.४०/E-1267932

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या दि.०८-०९ जानेवारी, २०२५ रोजी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने माहिती सादर करणेबाबत**

संदर्भ १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि.३० ऑगस्ट, २०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगानेगठीत उपसमितीच्या अहवालातील शिफारसीच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शनकरणेसाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये सुकाणू समिती पुनर्गठीतकरण्यात आलेली आहे.

या समितीची बैठक दि.०८-०९ जानेवारी, २०२५ रोजी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत सुकाणू समितीने दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठांनी खालील प्रकारची माहिती संचालनालयास सादर करावी.

अ) **सुकाणू समितीमधील सदस्यांची विद्यापीठनिहाय मार्गदर्शक /समन्वयक म्हणून नियुक्ती**

सुकाणू समितीने दि.०८-०९ ऑक्टोबर, २०२४ च्या बैठकीत ठरल्यानुसार विद्यापीठांना सुकाणू समितीच्या माध्यमातून मार्गदर्शक म्हणून विद्यापीठनिहाय सदस्य नामनिर्देशित केले होते.

त्यानुसार काही विद्यापीठांना समिती सदस्यांनी भेट दिली असून उर्वरित मार्गदर्शकांच्या भेट देणे कार्यक्रम अद्यापपर्यंत पूर्ण झालेला नाही, त्याअनुषंगाने विद्यापीठनिहाय मार्गदर्शक व समन्वयकांशी विद्यापीठांनी संपर्क करून भेटीचा कार्यक्रम आयोजित करावा. तसेच विद्यापीठांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भातील आवश्यक माहिती https://forms.gle/4s7ton6vjUVe1kbB7 या google लिंक वर तात्काळ भरण्याची दक्षता घ्यावी.तसेच गुगल फॉर्म मधील प्रश्नावलीची संपूर्ण माहिती मार्गदर्शकाच्या भेटीवेळेस त्यांना सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव | मार्गदर्शक/समन्वयक |
|---|---|---|
| १ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | श्री.महेश दाबक,युगांक गोयल |
| २ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | डॉ.डी.टी.शिर्के,डॉ.अश्विनीकुमार शर्मा |
| ३ | डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई | |
| ३ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | डॉ.माधव वेलिंग, डॉ.विलास सपकाळ, डॉ.प्रशांत मगर |
| ४ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | डॉ.आर.डी.कुलकर्णी, डॉ.वाल्मिक सरवदे |
| ५ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | डॉ.नितीन करमळकर, डॉ.व्ही.बी.गायकवाड |
| ६ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | डॉ.विलास सपकाळ, डॉ.क्रांतीकुमार पाटील |
| ७ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर | डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, डॉ.एफ.सी.रघुवंशी |
| ८ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | डॉ.अजय भामरे, श्री.अनिल राव |
| ९ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | डॉ.उज्वला चक्रदेव, डॉ.सुप्रिया पाटील |
| १० | कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक नागपूर | |
| ११ | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, श्री.अनिल राव |
| १२ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड | डॉ.आर.डी.कुलकर्णी, श्री.भरत अमळकर |

उक्त मार्गदर्शकांनी पुढील १५ दिवसातसंबंधित विद्यापीठास भेट देणे, तेथील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेणे, समस्या, अडचणी इ.चे निराकरण करणे, विद्यापीठांच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भातील Best Practices अभ्यासणे इ.जबाबदारी पार पाडतील. विद्यापीठांनी या भेटीदरम्यान आपल्या विद्यापीठाचे प्र-कुलगुरू यांना याकरिता नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करावे. विद्यापीठांनी आपल्या विद्यापीठाच्या संबंधित मार्गदर्शकांशी संपर्क करावा.

**ब) नॉन बीए/बीकॉम/बी.एस्सी अभ्यासक्रमांबाबतची माहिती**

Non BA/B.Com/B.Scअभ्यासक्रमांबाबत अकृषी विद्यापीठांनी तयार केलेला श्रेयांक आराखडयाची माहिती अद्यापही अप्राप्त असून सर्व विद्यापीठांनी हार्डकॉपी स्वरूपात या संचालनालयास तात्काळ सादर करण्यात यावी व त्याची प्रत उपकार्यबल गटाचे प्रमुख डॉ.युगांक गोयल यांच्या yugank.goyal@flame.edu.in या ईमेल पत्यावर पाठवावी.

**क) खालील प्रश्नांचीहोय /नाही स्वरूपात माहिती सादर करण्यात यावी.**

१)शासन निर्णय दि.२०.०४.२०२३, १६.०५.२०२३, ०४.०७.२०२३ व शासन पत्र दि.१३.०३.२०२४ नुसारश्रेयांक आराखडा स्वीकारला आहे का?

२) सहा व्हर्टिकलमध्ये बहुविद्याशाखीय पद्धती स्वीकारली आहे का?

३) IKS, मूल्यांकन पद्धती, OJT Internship आणि संशोधनसाठीचे व्हर्टिकल्स पदव्युत्तर अभ्यासक्रमात स्वीकारले आहे काय?

**ड)** विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.०३.०१.२०२५ च्या सार्वजनिक सूचनेअन्वये Grading of Higher Education Institution (HEI) based on implementation on National Education Policy २०२०चा मसुदा प्रसिद्धकेला असून या मसुद्यातील Quantifiers अंतर्गत देण्यात आलेल्या ४९ मुद्दयांबाबतची मुद्देनिहाय माहिती संचालनालयास तात्काळसादरकरण्यात यावी.

**इ) IKS अभ्यासक्रमाबाबत**

सर्व विद्यापीठांनी IKS अभ्यासक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाची Soft Copy(PDF) संचालनालयास सादर करण्यात यावी.

ई) OJT/Internship संदर्भात यापूर्वी गुगल फॉर्म क्रमांक १ व २ व्दारे सर्व विद्यापीठांकडून आणि स्वायत्त महाविद्यालयांकडून माहिती संकलित करण्यात आली होती. तथापि मागविण्यात आलेल्या माहितीत त्रुटी असणे तसेच चुकीची माहिती अपलोड करणे किंवा माहिती निरंक म्हणून दर्शविणे या कारणास्तव सदर माहितीचे पृथकरण करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. सबब, खालील दिलेले गुगल फॉर्म क्रमांक १ व २ ची लिंक आणि त्या लिंकचा Edit Option सर्व विद्यापीठांसाठी /स्वायत्त महाविद्यालयांसाठी खुला करण्यात येत असून विद्यापीठांनी/स्वायत्त महाविद्यालयांनी आपली माहिती पुन्हा Edit करून अचूकपणे भरून submit करावी.

गुगल लिंकखालीलप्रमाणे

| अ.क्र. | गुगललिंक | | |
|---|---|---|---|
| | https://forms.gle/wB5YywKiLfVK2y1F6 फॉर्म लिंक क्र.१ | राज्यातील अकृषी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आंतरवासिता /फिल्ड प्रोजेक्ट/ओजेटी संदर्भातील अभ्यासक्रमाची माहिती | खुद्द विद्यापीठांकरिता |
| | https://forms.gle/F7iCdnGbtPMH5nGK7 गुगल फॉर्म लिंक क्र.२ | राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आंतरवासिता /फिल्ड प्रोजेक्ट/ओजेटी संदर्भातील अभ्यासक्रमाची माहिती | अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता |

**वर नमूद केलेले अ ते इ यामधील माहिती हार्डकॉपी स्वरूपात संचालनालयास दि.१३ फेब्रुवारी, २०२५ रोजीसकाळी ११.०० वा. खास दूतामार्फत या संचालनालयास सादर करावी. तसेच जी माहिती गुगल लिंक तसेच सुकाणू समिती सदस्यांच्या मेलवर मागविण्यात आली आहे ती माहिती संबधितांच्या मेलवर तात्काळ पाठविण्यात यावी याची दक्षता घ्यावी.**

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 07-02-2025 17:29:50

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षणसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

**प्रत- माहितीस्तव सादर**
मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.